# Central Post

Rotary

Rotary Club of Ahmednagar Central




## UNITE FOR GOOD



Director WINS
Director Bulletin Editor
**Rtn. Sujata Katariya**



**President**
Rtn. Sunil Katariya



**Secretary**
Rtn. Amar Gurap

RID 3132

CLUB ID : 26235

Official Bulletin –
**Issue No. 5**

Rotary Year 2025–26

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल & इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगर,यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत हिमोग्लोबिन  तपासणी शिबिर

**स्थळ : महाराणी शाळा, केडगाव आज दिनांक : 02 सप्टेंबर 2025 वेळ : सकाळी 10:30 वाजता**
**आयोजक :रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल & इनरव्हील क्लब अहमदनगर**
**शिबिराच्या ठळक बाबी : मोफत हिमोग्लोबिन  तपासणीआरोग्य तपासणी व मार्गदर्शन "कळी उमलताना मुलीसाठी महत्वपूर्ण व्याख्यान "वसमुपदेशन व जनजागृती**
**रो. सुनिल कटारिया,अध्यक्ष**
**रो. अमर गुरप,सचिव**
**रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल अहमदनगर**
**रो. मधुबाला चोरडिया,अध्यक्ष**
**इंनरव्हील क्लब : रो सुजाता कटारियासचिव, इनरव्हील क्लब**






रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलकडून बालक मंदिर महिला मंडळ शाळेत नेत्र व दंत तपासणी शिबिर.....रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, इंडियन डेंटल असोसिएशन, अहमदनगर व चैतन्य नेत्रालय, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच नेत्र व दंत तपासणी शिबिर बालक मंदिर महिला मंडळ शाळा, दिल्ली गेट, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आले.या उपक्रमात सुमारे 150 विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. चैतन्य नेत्रालयाच्या नेत्रतज्ज्ञ डॉ. दीपा मोहळे यांनी विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी केली. त्यांनी डोळ्यांचे महत्त्व, घ्यावयाच्या काळजीच्या उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले. तसेच मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम स्पष्ट करून 15 वर्षांपर्यंत विद्यार्थ्यांनी मोबाईल वापर टाळावा असे सांगितले. त्याचबरोबर टी.व्ही. पाहताना कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी हेही त्यांनी समजावून सांगितले.इंडियन डेंटल असोसिएशन, अहमदनगरच्या डॉ. नेहा जाजू व डॉ. प्रिया भालसिंग यांनी विद्यार्थ्यांची दंत तपासणी केली. डॉ. नेहा जाजू यांनी दंत आरोग्याचे महत्त्व, दातांची योग्य देखभाल व दंतस्वच्छता न केल्यास होणारे दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.या प्रसंगी रोटरी क्लब अध्यक्ष रोटेरियन सुनील कटारिया, सचिव रोटेरियन अमर गुरप , क्लब डायरेक्टर रोटेरियन डॉ. श्रेया खाजगीवाले, रोटेरियन सुनील मुथा, महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. ज्योती केसकर, उपाध्यक्षा सौ. विद्या होलेहोनर, संचालिका सौ. गौरी मुळे, सौ. शिल्पा रसाळ, सौ. रोहिणी पुंडलिक, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता सुळ तसेच शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.या वेळी रोटरी क्लब अध्यक्ष रोटेरियन सुनील कटारिया व सचिव रोटेरियन अमर गुरप यांचा मुख्याध्यापिकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सौ.मनीषा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे अत्यंत यशस्वी ठरला.











समाचार

## साईबन कृषी पर्यटन क्षेत्रात रोटरी पीस सेंटरचे लोकार्पण

# रोटरी विश्वातील शांततेचा दीपस्तंभ म्हणजे रोटरी पीस सेंटर- मराठे




**समाचार/नगर-दि.१७**

येथील साईबन कृषी पर्यटन क्षेत्रात आज रोटरी पीस सेंटरचा लोकार्पण सोहळा आंतरराष्ट्रीय रोटरी प्रांत ३१३१ चे प्रांतपाल संतोष मराठे यांच्या हस्ते संपन्न झाला.

सदर प्रसंगी पीस सेंटरच्या संचालिका तसे रोटरी पीस कमिटीच्या डायरेक्टर डॉ. सुधा कांकरिया, साईबन प्रकल्पाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया, माजी प्रांतपाल शिरीष रायते, प्रमोद पारीख, नियोजित प्रांतपाल क्षितीज झावरे, ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या संचालिका निर्मला दिदी, शिक्षण तज्ज्ञ डॉ. सर्जे राव निमसे, अध्यक्ष सुभाष गर्जे उपस्थित होते. रोटरी विश्वातील शांततेचा दीपस्तंभ म्हणजे निसर्गाच्या कुशीत वसलेले हे रोटरी पीस सेंटर आहे. या व्दारे समाजात शांती निर्माण करणारे अनेक प्रकल्प कार्यान्वीत होत आहेत याचा आनंद वाटतो. मन:शांतीसाठी राजयोगा मेडिटेशनची सुविधा, स्त्रीभ्रुणहत्या तसेच हार्ट ॲरटॅक विषयीचे सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी स्त्री जन्माचे स्वागत करा तसे निरोगी हृदय प्रकल्प तसेच नैराश्य व आत्महत्या रोखण्यासाठी कौन्सीलींग सेंटर, जागतिक शांतीकडे घेऊन जाणारे संघटीत मेडिटेशन हे सर्व प्रकल्प समाज उपयोगी व शांती प्रस्थापित करणारे आहेत व सध्या जगात प्रत्येकालाच शांतीची आवश्यकता आहे. हे रोटरी पीस सेंटर समाजासाठी वरदान ठरत आहे, असे प्रतिपादन संतोष मराठे यांनी केले.

पुणे येथे सिम्बायसिस इंस्टीटयुट व्दारे रोटरीचे मोठे पीस ट्रेनिंग सेंटर उभारले जात आहे. त्यातून शांतीचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. अशी माहिती मराठे यांनी दिली. सदर कार्यक्रमात माजी प्रांतपाल प्रमोद पारीख तसेच शिरीष रायते, क्षितीज झावरे, ब्रह्माकुमारीज् अहिल्यानगरच्या निर्मला दिदी यांच्या हस्ते इको फ्रेंडली ध्यान मंदिर, सेल्फी पॉईंट, पीस पार्क, शांतता पहाडी, हेल्दी हार्ट प्रोजेक्ट, स्त्री जन्माचे स्वागत करा प्रोजेक्ट प्रदर्शनीचे उद्घाटन झाले. सुरूवातीस अध्यक्ष सुभाष गर्जे यांनी 'आओ हम तुम शांतीदूत बन जाए' हे गीत सादर करून क्लब तर्फे स्वागत केले. माजी प्रांतपाल प्रमोद पारीख यांनी रोटरी पीस सेंटरचे कौतुक केले.

डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या की आंतरिक शांती, सामाजिक शांती व त्यातुन जागतिक शांती कार्यरत असते. आंतरिक मन:शांतीसाठी राजयोगा मेडिटेशन, सामाजिक प्रश्न सोडवून त्यातुन निर्माण होणारी सामाजिक शांतता व हे सगळे मिळून जागतिक शांततेकडे पडणारे मंगल पाऊन यासाठी रोटरी पीस सेंटर-साईबन में मधुबन कार्यरत आहे. मन:शांतीसाठी बह्माकुमारीज्चे राजयोगा मेडिटेशन तर सामाजिक शांतीसाठी रोटरीचे सेवा कार्य या दोन्हींचा संगम येथे होत आहे. म्हणूनच रोटरी पीस सेंटरला- साईबन में मधुबन हे नांव देण्यात आले आहे. बी. के. निर्मला दिदी यांनी राजयोगा मेडिटेशनची माहिती देऊन सर्वांना शांततेची अनुभुती करवली. शेवटी डॉ. प्रकाश कांकरिया यांनी आभार मानले. राजेश उपाध्ये यांनी सुत्रसंचलन केले त्यांना निलेश वैकर यांनी मदत केली. सदर प्रसंगी सचिव संदीप ठोंबे, पुरूषोत्तम जाधव, दिलीप कर्नावट, सुनिता कर्नावट, माधव देशमुख, साधना देशमुख, सुहास क्षीरसागर, स्नेहल क्षीरसागर, अमर गुरप सहित अनेक रोटरी सदस्य उपस्थित होते.




